# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.07.2025** **वार:शुक्रवार**

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण; राज्याला विविध श्रेणीत दहा पुरस्कार
2. राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडली असल्याची विरोधी पक्ष नेत्यांची विधान परिषदेत टीका
3. राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये विज्ञान आणि नाविन्यता उपक्रम केंद्रं सुरू करण्याचा सरकारचा निर्णय आणि
4. नाशिकमध्ये रस्ते अपघातात 7 जणांचा मृत्यू, 2 जण गंभीर जखमी

**राष्ट्रपती-स्वच्छ भारत**

स्वच्छ भारत शहरी मिशन अंतर्गत आयोजित स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण राष्ट्रापती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल झालं. नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय गृहनिर्माण, नगर विकास मंत्री मनोहर लाल आणि राज्यमंत्री तोखन साहू यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राला विविध विभागांमध्ये दहा राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. राज्याच्या नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी हे पुरस्कार स्वीकारले. ऐकुया याबाबतचा वृत्तांत....

**'प्राचीन काळापासून स्वच्छता देशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक चेतनेच्या केंद्रस्थानी राहिली असून स्वच्छ, विकसित आणि निरोगी भारताच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील राहावं', असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल देशवासियांना केलं. स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलताना राष्ट्रपती म्हणाल्या....**

**अपने घरों को उपासना स्थलों को तथा आसपास के परिवेश को स्वच्छता रखने की परंपरा हमारी जीवनशैली का अभिन अंग थी। हमारे सफाई मित्र, हमारे राष्ट्रीय स्वच्छता अभियान के अग्रिम पंक्ति के योद्धा है।**

**या स्पर्धेत इंदूरनं सलग आठव्या वर्षी देशातील 'सर्वात स्वच्छ शहर' म्हणून आपलं मानांकन कायम ठेवलं आहे. सुरत दुसऱ्या क्रमांकावर तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातल्या मीरा भाईंदर महानगर पालिकेने 3 ते 10 लाख लोकसंख्येच्या गटात देशात अव्वल स्थान मिळवलं आहे. कराड नगरपालिकाने 50 हजार ते 3 लाख लोकसंख्येच्या गटात देशात दुसरं स्थान पटकावला. नवी मुंबई महानगरपालिकेने 'सुपर स्वच्छ लीग सिटी' पुरस्कार पटकावला आहे. पुणे जिल्ह्यातील लोणावळा आणि सासवड, सांगलीतली विटा, अहिल्यानगरमधली देवळाली प्रवरा, साताऱ्यातली पाचगणी आणि कोल्हापूर जिल्ह्यातल्या पन्हाळा नगरपालिकेला विविध गटात पुरस्कार मिळाले आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने देशात सातवा तर राज्यात प्रथम क्रमांक मिळवला तसंच 7 स्टार गार्बेज फ्री सिटी आणि वॉटर प्लस ही दोन्ही मानांकनंही मिळवली आहेत. याबाबत आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह म्हणाले.....**

**वेगवेगळी ऑर्गनायझेशन एनजीओ सिव्हिल सोसायटी आपल्या शहराचे सर्व लोकप्रतिनिधी यांच्या सर्वांचे साथ आणि पाठिंबाच्या मुळे आज आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला सातवे क्रमांकावर देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये पहिल्या सर्वात स्वच्छ आपलं शहर म्हणून घोषित करण्यात आला आहे. डेफिनिटली याच्या पुढे सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात आम्हाला काम करण्याची गरज आहे. ते शंभर टक्के पुढच्या वर्षी पहिलं स्थान आपण कसं पटकावता येईल आणि याच्यासोबतच सिटिझन जे आपले आहेत शहरवासियांना चांगली ते चांगली सर्व्हिस आणि स्वच्छ आणि सुंदर आणि हरित शहर कसं बनवून देता येईल हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आमचं ध्येय असणार आहे.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी सीमा चोरडियासह माधवी कुलकर्णी पुणे.**

**विधिमंडळ**

विधानभवनाच्या प्रांगणात आमदारांना मारहाण झाल्याचे मुद्दे काल दोन्ही सभागृहांमध्ये समोर आले. आपल्याला मारण्यासाठी काही लोकांना बाहेरून आणलं होतं असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केला. या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. तर, आमदार गोपीचंद पडळकर यांना विधान भवनाच्या लॉबी मध्ये धक्काबुक्की करण्यात आली, त्याबाबत कारवाई करण्याची मागणी संजय उपाध्याय यांनी सभागृहात केली, ती तातडीनं करण्यात येईल अशी ग्वाही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली.

राज्यात कायदा सुव्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नाही, अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडताना केली. या वर्षी 31 मेपर्यंत राज्यात 1 लाख 60 हजाराहून जास्त गुन्ह्यांची नोंद झाली आहे; राज्यातली कायदा व्यवस्थेची परिस्थिती इतकी बिघडलेली असताना सरकार फक्त जाहिराती आणि भाषणांमध्येच आहे, अशी टीका त्यांनी केली.

राज्यात लवकरच धर्मांतरविरोधी कायदा करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सांगितलं. यासाठी नेमण्यात आलेल्या समितीनं नुकताच त्यांचा अहवाल मंत्रीमंडळाला सादर केला आहे; त्याचा अभ्यास करून निर्णय घेतला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. पंढरपूर इथला सुधारित तीर्थक्षेत्र आराखडा लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात येतील, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सांगितलं.

'सरकार मुंबईला तोडण्याचं नाही तर जगाशी जोडण्याचं काम करत आहे. आगामी काळात मुंबईचा जीडीपी दुप्पट होईल', असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानसभेत सांगितलं. नियम 293 अंतर्गत झालेल्या चर्चेला ते उत्तर देत होते. ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्यामुळे या निवडणुका आतापर्यंत झाल्या नाहीत. येत्या चार महिन्यांत या निवडणुका होतील, असं शिंदे यांनी सांगितलं.

'राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये ज्येष्ठ वैज्ञानिक डॉक्टर जयंत नारळीकर यांच्या नावानं विज्ञान आणि नाविन्यता उपक्रम केंद्रं सुरु करण्यात येतील', अशी घोषणा माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी काल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात केली....

**महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक विज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपकेंद्र उभारणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्याचा शासनाचा मानस आहे. आणि म्हणून विज्ञान क्षेत्रात अमूल्य योगदानाबद्दल थोर शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे नाव देऊन या कार्यास मानवंदना अर्पित करत आहोत.**

**एनएफडीसी**

मुंबईतील राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या आवारातील भारतीय चित्रपट संग्रहालयात, गुलशन महलमध्ये भारत पॅव्हेलियनचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज होणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पुढाकाराने सकारलेलं हे भारत पॅव्हेलियन; म्हणजे, देशाला जागतिक स्तरावर एक सर्जनशील महासत्ता बनवण्याच्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहे.

**वैष्णव**

देशातील दहा लाख नागरिकांना कृत्रिम बुद्धीमत्तेचं प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची घोषणा केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ते काल नवी दिल्ली इथं 'सामान्य सेवा दिवस-डिजिटल भारताची दहा वर्षे' या कार्यक्रमात बोलत होते. या प्रशिक्षणासाठी ग्रामीण स्तरावरच्या उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.

**रेल्वे-अहिल्यानगर**

पुणतांबा-साईनगर शिर्डी रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाला रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंजुरी दिली आहे. 240 कोटी रुपये खर्चाच्या आणि साडे 16 किलोमीटर लांबीच्या या मार्गाचा फायदा केवळ भाविकांनाच नाही तर नियमित प्रवासी, विद्यार्थी, व्यापारी आणि शेतकऱ्यांनाही होणार आहे.

**वारसास्थळ-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणचा ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ला आणि विजयदुर्गाचा युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळ यादीत समावेश झाला आहे; यामुळे सिंधुदुर्गतल्या पर्यटनाला आणखी चालना मिळणार आहे. ऐकुया एक वृत्तांत...

**युनेस्कोच पथक या किल्ल्यांची पाहणी करायला आलं होत त्यावेळी मालवणच्या इतिहास संशोधक डॉ. ज्योती बुवा-तोरसकर यांनी किल्ल्यांविषयीची माहिती त्या पथकाला दिली होती. सिंधुदुर्ग किल्ल्यात तर लोकवस्ती आहे, त्या रहिवाशांनी या ऐतिहासिक घटनेबद्दल आनंद व्यक्त केला आहे. युनेस्कोच्या यादीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या या दोन किल्ल्यांच्या समावेशामुळे अनेक रहस्यांचा शोध घ्यायला देखील मदत होणार आहे. विजयदुर्ग किल्ल्याच संरक्षण करण्यासाठी समुद्रात उभारण्यात आलेली भिंत, रहस्यमयी वाघोटन खाडी तसेच सिंधुदुर्ग किल्ल्यातल्या विहिरीत सापडणार गोडं पाणी, कोळ्याच्या वेशातले शिवछत्रपतींची मूर्ती अशा अनेक गोष्टींवर प्रकाश पडू शकतो आणि संशोधनातून एक नवीन इतिहास शिवप्रेमींसमोर येऊ शकतो. या दोन्ही किल्ल्यांना युनेस्कोच्या यादीत स्थान मिळाल्यामुळे पर्यटनाच्या कक्षा विस्तारणार आहेतच पण पर्यटकांसोबतच इतिहास अभ्यासकांना देखील नवप्रेरणा मिळणार आहे एवढं मात्र नक्की. निलेश जोशी, सिंधुदुर्ग**

**सरसंघचालक-सोलापुर**

राष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीने महिला हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचं सांगत देश मोठा करण्यासाठी 142 कोटी नागरिकांनी एकत्र आलं पाहिजे, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांनी काल केलं. सोलापुरातील उद्योगवर्धिनी संस्थेला 21 वर्षं पूर्ण झाल्याबद्दल सरसंघचालक भागवत यांच्या उपस्थितीत हुतात्मा स्मृती मंदिरात 'परिवार उत्सव' कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं, यावेळी ते बोलत होते.

**अपघात-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात कार आणि मोटारसायकलमध्ये धडक होऊन झालेल्या अपघातात 3 महिला आणि एका बालकासह 7 जणांचा मृत्यू झाला, तर 2 जण गंभीर जखमी झाले आहेत. नाशिक- दिंडोरी रस्त्यावर बुधवारी रात्री एक कार दुचाकीला धडकली आणि दोन्ही वाहनं रस्त्यालगत असलेल्या एका लहान नाल्यात उलटली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**निधन-धुळे**

धुळ्यातील ज्येष्ठ तबलावादक खान्देश भूषण मधुकरराव गुरव यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. ते 88 वर्षांचे होते. त्यांनी विविध कार्यक्रमात तबल्याची साथ केली होती.

**हवामान**

येत्या चोवीस तासात राज्याच्या सर्वच विभागात पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.